# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४(१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

**(आस्थापना विभाग)**

एम. आय. डी. सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५

दुरध्वनीक्र. ०७१३२-२२३१०४ email:-gondwanaesst@gmail.com

जा.क्र. गो.वि./आस्था./४६२४/२०१९ — दि.३१/१२/२०१९

# परिपत्रक

**विषय :- विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयात नियमीत राष्ट्रगीत सुरू करण्याबाबत...**

संदर्भ :- १) दिनांक ०३ मे २०१९ रोजी आयोजीत अधिसभेच्या वार्षिक सभेचे कार्यवृत्तानुसार.
२) कार्यालयीन परिपत्रक क्र. गों.वि./आस्था/२८३३/२०१९, दिनांक ३१/०७/२०१९
३) दिनांक १५ नोव्हेंबर २०१९ रोजी आयोजीत अधिसभेच्या द्वितीय सभेचे कार्यवृत्तानुसार.

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये, विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयातील प्राचार्यांना कळविण्यात येते की, दिनांक ०३ मे, २०१९ रोजी संपन्न झालेल्या विद्यापीठ अधिसभेतील बाब क्र. ९, मधील क्रमांक १, अन्वये घेतलेल्या निर्णयानुसार, विद्यापीठ व विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयातील विद्यार्थी व कर्मचाऱ्यांमध्ये राष्ट्रभक्ती जागृत व्हावी व राष्ट्राप्रती नमन करण्याची संधी प्रत्येकाला प्राप्त व्हावी या उदात्त हेतुने विद्यापीठ व विद्यापीठ संलग्नित सर्व महाविद्यालयांमध्ये दररोज कामकाजाच्या सुरूवातीला व प्रत्येक कार्यक्रमाच्या वेळी राष्ट्रगीत म्हणणे अनिवार्य करण्याबाबत मांडण्यात आलेल्या ठरावास मान्यता प्रदान करण्यात आली. त्याअनुषंगाने संदर्भीय अधिसभेच्या निर्णयांच्या अधिन राहुन विद्यापीठ व विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी दररोज कामकाजाच्या सुरूवातीला व प्रत्येक कार्यक्रमाच्या वेळी राष्ट्रगीत गायनाबाबत कार्यवाहीची अंमलबजावणी करण्याबाबत संदर्भीय पत्र क्र. २ अन्वये परिपत्रकाद्वारे सुचना निर्गमित करण्यात आले.

दिनांक १५ नोव्हेंबर, २०१९ रोजी संपन्न झालेल्या अधिसभा बैठकी दरम्यान कार्यवृत्तावर घेतलेली कार्यवाहीतील **बाब क्रमांक १२, मधील क्रमांक १०** च्या अनुषंगाने, दिनांक ०३ मे, २०१९ रोजी संपन्न झालेल्या कार्यवाही अहवालातील बाब क्र. ९, मधील ठराव क्रमांक १, नुसार सर्व महाविद्यालयात राष्ट्रगीत म्हणणे अनिवार्य करण्याबाबत ठराव पारीत झालेला होता परंतु अजुनही काही महाविद्यालयात राष्ट्रगीत म्हटले जात नाही. त्यामुळे राष्ट्रगीत म्हणण्यासंबंधाने पुन:श्च परिपत्रक काढुन महाविद्यालयांना कळविण्यात यावे अधिसभा सदस्यांनी ठराव पारीत केलेला आहे.

त्याअनुषंगाने संदर्भीय अधिसभेच्या निर्णयांच्या अधिन राहुन विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी दररोज कामकाजाच्या सुरूवातीला व प्रत्येक कार्यक्रमाच्या वेळी राष्ट्रगीत गायनाबाबत कार्यवाहीची अंमलबजावणी करावी.

**(डॉ. ईश्वर श्रा. मोहुर्ले)**
**कुलसचिव**

**प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-**

१) मा. कुलगुरूंचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली, यांना माहितीकरीता अग्रेषीत.
२) मा. प्र-कुलगुरूंचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहितीकरीता अग्रेषीत.
३) मा. कुलसचिवांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
४) मा. प्राचार्य, संलग्नित महाविद्यालये, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
५) उपकुलसचिव, महाविद्यालयीन विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली